# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०- २५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ-मेल: approval@unipune.ac.in

संदर्भ : सीसीओ /४१३

दिनांक : ०७/०४/२०१६

मा. प्राचार्य / संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था
पुणे, अहमदनगर व नाशिक

विषय : अपंगांच्या विविध मागण्यांबाबत...

संदर्भ : उच्च शिक्षण विभाग, पुणे यांचे क्र. उशिसं/२०१५/अपंग/मवि-१/३९६०, दि. २१ मार्च, २०१६

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्र सोबत जोडलेले असून त्यातील आशय स्वयंस्पष्ट आहे. शैक्षणिक संस्था व महाविद्यालयांत शासन नियमानुसार अपंगांसंदर्भातील सोबतच्या पत्रातील मुद्यांवर उचित कार्यवाही करून, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

कळावे,

आपला,

संचालक
(म.वि.वि.मं.)

सोबत : वरीलप्रमाणे.

Savitribai Phule Pune University
Academic Branch, Acknowledgement
Date 26 MAR 2016
3515

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं. ०२० / २६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९. फॅक्स नं.- ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/२०१५/अपंग/मवि-१/३२६० दि.- १७.०२.२०१६ 21 MAR 2016

Director BCUD Office
Savitribai Phule Pune University
In.Dt 23 MAR 2016
Inward 1243
Outward Date 26/03/2016

983
22/03/2016
23/03/2016
D/BCUD

प्रति,

१) विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, सर्व विभाग.

२) कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

**विषय :- अपंगांच्या विविध मागण्यांबाबत.**
**संदर्भ:-** संचालनालयास प्राप्त अपंगांसदर्भातील विविध निवेदने.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संचालनालयास मा. मंत्री महोदयांमार्फत , शासन स्तरावरुन तसेच विविध संघटनांकडून अपंगांच्या विविध मागण्यांबाबत निवेदने प्राप्त होतात. अपंगांच्या विविध मुद्दांसंदर्भात शासन नियमांनुसार कार्यवाही करण्याबाबत संचालनालयाकडून वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. त्यापैकी काही मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

१) सन १९९५ च्या अपंग कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी.

२) अपंगांचा अनुशेष भरण्यात यावा.

३) अपंगांकरिता महाविद्यालयांत Ramp Bar, Toilet, Bathroom इत्यादी सुविधा पुरविण्यात याव्यात.

४) अपंगांना देय असणाऱ्या ३ % आरक्षणाची उचित कार्यवाही करण्यात यावी.

५)अपंगांची पदे भरताना खऱ्या अपंगांनाच नोकरीत सामावून घेण्याबाबत दक्षता घेण्यात यावी.

६) अपंग कर्मचाऱ्यांना शासनाच्या नियमानुसार उपकरणे / सहायक तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यात यावीत.

आपल्या अधिनस्त शासकीय / निमशासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था व महाविद्यालयांत शासन नियमांनुसार अपंगांसंदर्भातील उपरोक्त मुद्दांच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात यावी तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

(डॉ.व्ही. आर. मोरे )
सहसंचालक
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य , पुणे- १

प्रत- मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

Fr 3Feb15/letter2015-16/Apang